# मुखेडातील दोन चोरटे देगलूर पोलिसांच्या ताब्यात

सकाळ दि. 05/05/2023

## दहा दुचाकी जप्त; पोलिस अधीक्षकांकडून पथकाचे कौतुक

**देगलूर, ता. ४ (बातमीदार) :** शहर व परिसरातील दुचाकी चोरांचा तपास करीत असताना देगलूर पोलिसांनी भगनुरवाडी (ता. मुखेड) येथील दोन चोरट्यांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून विविध ठाणे अंतर्गत लंपास केलेल्या दहा दुचाकी हस्तगत करण्यात आल्या असून त्याची किंमत दोन लाख तीस हजार एवढी आहे.



**देगलूर :** जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांतर्गत दुचाकी लंपास केलेल्या मुखेडातील दोन चोरट्यांना देगलूर पोलिसांनी अटक करून त्यांच्याकडून माल हस्तगत केला.

देगलूर पोलिस ठाण्यातंर्गत नागरिकांच्या दुचाकी चोरीस जाण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे व पोलिस उपअधीक्षक सचिन सांगळे यांच्या आदेशावरून देगलूरचे पोलीस निरीक्षक सोहन माछरे यांनी पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत मोरे यांच्या नेतृत्वाखाली एक पथक दुचाकी चोरीच्या प्रकरणी नियुक्त करून त्यांना तपासाबाबत मार्गदर्शन केले. पोलिस उपनिरीक्षक श्रीकांत मोरे यांनी चोरट्यांचा तपास करीत असताना त्यांना भगनुरवाडी येथील माधव मारुती पांचाळ (वय २८) आणि उमेश बालाजी इंगळे (वय २८) या दोन चोरट्यांचा सुगावा लागला. त्यांनी तत्काळ ताब्यात घेऊन त्यांना अटक केली. जिल्ह्यातील नायगाव, उमरी, धर्माबाद, लोहा या ठाण्यांतर्गत लंपास केलेल्या दहा दुचाकी चोरल्याचे तपासादरम्यान चोरट्यांनी सांगितले.

दुचाकी चोरट्यांना देगलूर पोलिसांनी अटक करून त्यांच्याकडून दोन लाख तीस हजाराचा माल हस्तगत केला. या तपास कामी पथकात उपनिरीक्षक श्रीकांत मोरे यांच्यासह पोलीस कर्मचारी श्री इंगोले, श्री. तलवारे, श्री. मलदोडे, श्री. आडबे आदींचा समावेश होता. या पथकाचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी अभिनंदन केले आहे.